अ) तक्त्यात नमूद (व्यक्त) केलेल्या प्रमाणात शुद्ध पांढर्या कुत्र्यांची संख्या किती आहे?

ब.) जनुकीय नमुन्यात आढळनार्या कुत्र्यांच्या प्रकाराची नावे सांगा

IV.खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (तीन गुणांचे प्रश्न)

33) शुद्ध ठेंगू वाटाण्याच्या वनस्पतीचा संयोग (संकर) शुद्ध उंच वाटाण्याच्या वनस्पतीशी घडवून आणला तर F2 पिढीमध्ये मिळवलेले निकाल (निष्पत्ती) चेकर बोर्डच्या सहाय्याने दर्शवा आणि मिळविलेल्या वनस्पतींच्या प्रकारांचे गुणोत्तर लिहा (April-2022, जुन 2022, MQP-1, 4 - 2025) (D)

34) गोल पिवळ्या रंगाचे (RrYy) बीज असलेल्या वनस्पतींचे सारख्याच वनस्पतीशी स्वपरागीभवन होते. F2 पिढीपासून द्विसंकरित फलनाने मिळणारा उत्पत्ती निकाल चेकर बोर्डच्या सहाय्याने दर्शवा F2 पिढीमध्ये मिळवलेल्या विविध वनस्पती लिहा (एप्रिल-2020) (जुन 2023) (MQP-1, 4-2025) (D)

35) मेंडलने उंच लाल फुले (TTRR) असलेल्या वनस्पतीशी ठेंगू पांढरी फुले (ttrr) यांचा संयोग घडवून आणला तर त्यांच्यापासून F1 पिढी निर्माण झाली. F1 पिढीतील मिळणार्या वनस्पती मूळ पिढीतील लाल फुले येणार्या वनस्पतीपेक्षा भिन्न होत्या .कारण लिहा. (A)

36) मेंडेलने लाल फुले असलेल्या (RR) वनस्पतीचे फलन पांढरी फुले असलेल्या (rr) वनस्पतीशी केले आणि अपत्य (संतती) निर्माण केल्या. F1 पिढीमध्ये मिळवलेली लाल रंगाची फुले ही जनक पिढीतील लाल रंगाच्या फुलांपासून वेगळी होती का? कारणांसह वर्णन करा. (सप्टेंबर 2020,) (MQP-1-2025) (A)

37) वडिलांकडून अनुवांशिकतेने मिळालेली गुणसूत्रे (मुलाचे) बाळाचे लिंग ठरवतात हे स्पष्ट करा (A)

38) मेंडेलच्या प्रयोगावरून हे एक कसे दिसून येते की गुणधर्म प्रकट आणि अप्रकट असू शकतात (D)

39) गोल बिया निर्माण करणारा प्रकट गुणधर्म असलेल्या वाटाणा वनस्पतीचा संयोग सुरकुतलेल्या बिया निर्माण करणारा अप्रकट गुणधर्म असलेल्या वाटाणा वनस्पतीशी केला. तर F2 पिढीतील वनस्पती दर्शवणारा चेकर बोर्ड तयार करा व युग्मके लिहा. (सप्टेंबर 2020) (A)

40) मेंडेलने गोल बिया असलेल्या उंच वनस्पती (TTRR) आणि सुरकुतलेल्या बिया असलेल्या ठेंगू वनस्पती (ttrr) यांच्यात संकर घडवून आणला. चेकर बोर्डच्या मदतीने F2 पिढीमध्ये मिळणार्या वनस्पतीचे प्रकार लिहा (A)

41) मेंडेलने पिवळ्या बिया असलेल्या उंच वनस्पती (TTYY) आणि हिरव्या बिया असलेल्या ठेंगू वनस्पती (ttyy) यांच्यात संकर घडवून आणला चेकर बोर्डच्या मदतीने पिढीमध्ये मिळणार्या वनस्पतीचे प्रमाण लिहा. (A)

9 प्रकाशाचे परावर्तन आणि अप वर्तन

अध्ययन अंश

1. प्रकाशाचे परावर्तन
2. गोलीय आरसे
3. आरशातून मिळणार्या प्रतिमा
4. गोलिय आरशाद्वारे मिळणाऱ्या प्रतिमांच्या रेखाकृती
5. अंतर्वक्र आरशातून मिळणार्या प्रतिमा
6. बहिर्वक्र आरशातून मिळणार्या प्रतिमा
7. अंतर्वक्र बहिर्वक्र आरशाचे उपयोग
8. गोलिया आरशाच्या परावर्तनासाठी चिन्हसंकेत
9. आरशाचे सूत्र आणि विशालन
10. प्रकाशाचे अपवर्तन
11. आयताकृती काचेच्या चिपेमधून होणारे अपवर्तन
12. अपवर्तनांक
13. भिंगाद्वारे प्रतिमांची निर्मिती
14. भिंगसूत्र आणि विशालन

क्रमांक	काठीण्य पातळी	प्रश्नांची संख्या	गुण	शेकडा प्रमाण
1	सोपे (Easy)	31	45	30
2	मध्यम (Average)	38	75	50
3	कठीण (Difficult)	21	29	20


I) योग्य पर्याय निवडा

1) अंतर्वक्र भिंगापासून वस्तूची अस्पष्ट प्रतिमा मिळवण्यासाठी वस्तूची स्थिती अशी असावी (F- मुख्य नाभी,C-वक्रता केंद्र,P- ध्रुव)(April 2019) (D)

अ) C व F च्या मध्ये ब) C च्या पुढे

क) P आणि F च्या मध्ये ड) F2 मध्य

2) दिलेल्या आकृतीतील निर्गत किरण ओळखा (D)



अ) CD ब) BC क) AB ड) IJ

3) अंतर्वक्र आरशाच्या वक्रता केंद्रामध्ये वस्तू ठेवली तर तयार होणाऱ्या प्रतिमेची स्थिती आणि स्वरूप हे आहे.(एप्रिल 2020) (D)

अ) F आणि C मध्ये उलटी ब) आरशाच्या पाठीमध्ये आणि सुलट

क) Fआणि P मध्ये आणि सुलट ड) वक्रता केंद्रामध्ये आणि उलटी

4) भिंगाचे नाभीय अंतर+0.50m आहे तर भिंगाचे सामर्थ्य आणि प्रकार हा आहे (एप्रिल 2020) (D)

अ) +2.0.Dआणि बहिर्वक्र ब) +2.0.Dआणि एक अंतर्गोल भिंग

क) 2.0 D आअंतर्वक्र भिंग ड) 2.0.D आणि बहिर्वक्र भिंग

5) जेव्हा वस्तू बहिर्वक्र भिंगाची नाभी F1आणि प्रकाशीय मध्य 'O' यांच्यामध्ये ठेवली जाते तेव्हा तयार होणाऱ्या प्रतिमेचे स्वरूप व आकार असा असतो (एप्रिल 2021) (D)

अ) आभासी उलटी आणि आकाराने मोठी लहान ब)खरी उलटी आकाराने लहान

क) आभासी उलटी आणि आकाराने लहान ड) खरी उलटी आणि आकाराने मोठी

6) खालील कोष्टकाचे निरीक्षण करा

पदार्थाचे माध्यम	.अपवर्तनांक
P	1.52
Q	1.44
R	2.42
S	1.33

तर या माध्यमामध्ये प्रकाशाचा वेग जास्तीत जास्त आहे. (D) (April2021)

अ) Q ब) P

क) S ड) R

7) खालीलपैकी कोणता गुणधर्मा बहिर्वक्र भिंगाचा आहे (एप्रिल 2021) (E)

अ)प्रकाशकिरणांचे वियोजन करणे ब) कडा जाड आणि मध्यभागी पाता

क) खरी आणि सुलटी प्रतिमा मिळवितात ड) कडा पातळ आणि मध्यभागी जाड असतात

8) अंतर्वक्र भिंगातून वस्तूची लहान आणि खरी प्रतिमा मिळण्यासाठी ची वस्तू ठेवावी. (March2022) (D)

अ) मुख्य केंद्रस्थानी F1 ब) मुख्य केंद्र बिंदू F1 आणि 2 F1आणी 2 F1 दरम्यान

क) 2F1पेक्षा जास्त ड) मुख्य केंद्रबिंदू आणि केंद्रबिंदू O दरम्यान

9) तुमच्या भिंगाबद्दल खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.(जून 2022) (D)

अ) प्रकाशकिरणांचे एकत्रीकरण होते ब) प्रकाशकिरणांना वेगळे करते

क) उलटी प्रतिमा निर्माण करते ड) वास्तव प्रतिमा निर्माण करते

10)आरसा वस्तूची सरळ विशालीत प्रतिमा तयार करतो त्या आरशाचा प्रकार आणि प्रतिमेचे स्वरूप अनुक्रमे हे आहे.

अ)बहिर्वक्र आरसा आणि आभासी प्रतिमा ब) अंतर्वक्र आरसा आणि वास्तव प्रतिमा

क) सपाट आरसा आणि वास्तव प्रतिमा ड) अंतर्वक्र आरसा आणि आभासी प्रतिमा

11) एक प्रकाशकिरण घन माध्यमातून विरळ माध्यमात प्रवेश करतो तेव्हा त्या प्रकाशकिरणाचा वेग असा असतो. (मार्च 2023) (D)

अ) कमी होतो आणि स्त ंभिकेकडे वळतो ब) वाढतो आणि स्तंभिकेपासून दूर जातो

क) कमी होतो आणि स्तंभिकेपासून दूर जातो ड) वाढतो आणि स्त ंभिकेकडे वळतो.

12) वाहनांमध्ये मागील दृश्य पाहण्यासाठी या प्रकारचा आरसा वापरतात. (ऑगस्ट 2024) (E)

अ) सपाट आरसा ब) बहिर्वक्र आरसा

क) अंतर्वक्र आरसा ड) सपाट अंतर्गोल आरसा

13) बहिर्वक्र आरसे यामध्ये वापरतात (एप्रिल 2025) (E)

अ) विजेरी बॅटरी ब) वाहनांचेमागील दृश्य पाहण्यासाठी

क) सर्चलाइट ड) दाढी करताना आरसा

14)गोलाकार अरशाचा परावर्तित पृष्ठभाग हा MQP-1(E)

अ)वक्रता केंद ब)ध्रुव

क)वक्रतेची त्रिज्या ड)छिद्र(MQP -१)

15)अंतर्वक्र भिंगाबद्दल संबंधित खालीलपैकी बरोबर विधान हे आहे (June 2022) (D)

अ) प्रकाशकिरणांना एकत्रित करते ब) प्रकाश किरणां दूर करते

क)उलटी प्रतिमा तयार करतात ड) खरी प्रतिमा तयार करतात

16) भिंगाचा मुख्यकेंद्रबिंदू आणि केंद्रबिंदूमधील अंतर आहे.

अ)वक्रतेची त्रिज्या ब)नाभीय अंतर

क)वस्तूचे अंतर ड) प्रतिमेचे अंतर

17) अंतर्वक्र आरशाने तयार होणारी प्रतिमा आभासी वास्तव आणि वस्तूपेक्षा मोठी असते तर वस्तूचे स्थान कोठे असेल

अ) मुख्य नाभी व वक्रता केंद्राच्या मध्ये ब) वक्रता केंद्रावर
क) वक्रता केंद्राच्या पलीकडे ड) आरशाची मुख्य नाभी वप्रकाशीय मध्यच्या मध्य

18) वक्रता केंद्रं आणि नाभीय अंतर य़ांच्यातील संबध आहे.

अ) R=2f ब) R= 1/2f
क)F=2R ड) F=2/3R

19) भिंगाच्या सामर्थ्याचे SI एकआहे

अ) मीटर ब)डायाप्टर

क) ओहम ड) सेंटीमीटर

20) नेत्ररोग तज्ञांनी दृष्टी सुधारण्यासाठी सांगितलेल्या भिंगाची शक्ति +2D.आहे तर त्या भिंगाचे नाभी अंतर किती

अ) 2 मीटर ब) 0.2 मीटर

क) 1.50 मीटर ड) 5 मीटर

21) भिंगासमोर ठेवलेल्या वस्तूचे अंतर आणि प्रतिमेचे अंतर अनुक्रमे -60 सेंटिमीटर आणि -20 सेंटिमीटर आहे तर प्रतिमेचे विशालन काढा

अ) -033 ब)+3


क) +0.33 ड) +4.0

22) काही माध्यमांचा अपवर्तनांक दिला आहे कोणत्या माध्यमात प्रकाशाचा वेग अनुक्रमे किमान आणि कमाल असतो K1-1. 62 L-1. 81 M-1. 94 N- 2.43

अ)के आणि एन ब) नआणि के

क) N आणि L ड) M आणि N

23) खालील आकृतीमध्ये पारदर्शक माध्यमाच्या प्रकाशित घनतेबाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे (D)



अ) n1= n2&n3> n4 ब) n1>n2 n3>n4

क) n1=n2n3>n4 ड)n1=n2 n3=n4

24) 4 बहिर्वक्र भिंग P,Q,R आणि S चे नाभीय अंतर अनुक्रमे 20 सेंटिमीटर 15 सेंटिमीटर 5 सेंटिमीटर आणि 10 सेंटिमीटर आहे सर्वात जास्त शक्ती असलेले भिंग(D)

अ) P ब) Q

क) R ड) S

25) बहिर्गोल भिंगातून अनंत अंतरावर प्रतिमा मिळवण्यासाठी वस्तुंची स्थिती आहे. (D)

अ) 2 F1 त्यापलीकडे ब) 2F1 आणि F1 दरम्यान

क) F1वर ड) F1आणि O दरम्यान

26) प्रकाशाच्या अपवर्तन प्रक्रियेत आपाती किरण आणि आपाती बिंदुक डे काढलेली स्तंभी का यामधील कोन 400अंश असतो पण परावर्तित किरण आणिआरशा च्या पृष्ठभागातील कोन(D)

अ)40 ब)500

क)600 ड) 900

27) जर प्रयोगासाठी 30 सेंटिमीटर नाभी अंतर असलेल्या गोलाकार आरशाचा विचार करायचा असेल तर त्याचे छिद्र (D) असावे. (D)

अ) 30से मी ब) 40 सेमी


क) 60से मी ड) 25सेमी

28) एक विद्यार्थी 2 मीटर अंतरावर एका सपाट आरशासमोर उभा आहे विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या प्रतिमेम अंतर किती आहे? (D)

अ) 2मी ब) 3मी

क) 4मी ड) 6मी

29) वरील प्रतीमे बाबत योग्य विधान असे आहे की(e



आ) A माध्यम प्रकाशाचा वेग जास्त असतो.

ब) A हे प्रकाशीयदृष्ट्या विरळ माध्यम आहे


क) B हे प्रकाशदृष्ट्या घन माध्यम आहे .

ड) माध्यम Bमध्ये प्रकाशाचा वेग जास्त असतो

30) बहिर्वक्र आरसामध्ये Lया इंग्रजी मुळाक्षरांची प्रतिमा ही आहे (September २०२०) (e

(A) 

(B) 

(C) 

(D) 

31) आरशाने तयार होणाऱ्या प्रतिमेचे विशालन 1.73असेल तर या प्रतिमेचे स्वरूप(MQP३) (D)आहे.

अ) वास्तव आणि मोठे क) मोठी

ब) वास्तव आणि लहान ड) लहान

32)एका भिंगाची शक्ती -2.5 D D असते .तर भींगाचे नाभीय अंतर व प्रकार (SUP २०२१) (D)

अ) +0.40मीटर आणि बहिर्वक्र भिंग

ब) -0.40 मीटर आणि बहिर्वक्र भिंग

क) +0.40 मीटर आणि अंतर्वक्र भिंग

ड) -0.40 मीटर आणि अंतर्वक्र भिंग प्रश्न

33) खालीलपैकी कोणता गुणधर्म अंतर्वक्र भिंगाचा आहे? (D)

अ) प्रकाशकिरणां चे अभिसरण होते

ब) कडा जाड आणि मध्यभागी पातळ

क) कडा पातळ आणि मध्यभागी जाड

ड) एक वास्तव आणि उलटी प्रतिमा तयार करते

34) भिंगाचेनाभीय अंतर+0.50 मीटर असते तर भिंगाचे सामर्थ्य आणि प्रकार लिहा (March २०२१) (D)

अ) +2.आणि बहिर्वक्र भिंग

ब) +2.0D आणि अंतर्वक्र भिंग

क) -2Dआणि अंतर्वक्रभिंग


ड) -2.0D आणि बहिर्वक्र भिं ग

II खालील प्रश्नांची उत्तरे द्या (१ गुणांचे प्रश्न)

35) वाहनांमध्ये मागील दृष्य पाहण्यासाठी बहिर्वक्र आरसा का वापरतात? (April २०१९) (E)

36) गोलीय आरशाची वक्रता केंद्र (मध्य) कोणते? (June २०१९)

371)दिलेल्या अपूर्ण आ कृतीचे निरीक्षण करा आणि अपवर्तन किरणे दाखवून आकृती पूर्ण करा आणि तयार झालेली प्रतिमा दाखवा? (September २०२०)३७)



38) +०.५ मीटर नाभी आंतराच्या बहिर्वक्र भिंगाचे सामर्थ्य काढा (June २०२२) (D)

39) ज्या गोलाकार आरशाचे नाभीय अंतर 25 सेंटिमीटर आहे त्याची वक्रता त्रिज्या शोधा(MQP२) (A)४०) प्रकाशाचे परावर्तन म्हणजे काय? €

40) लेटरल इन्व्हर्शन (उलटा पालट) म्हणजे काय?

41) गोलिय आरसा म्हणजे काय?

42) अंतर्वक्र आरशाची मुख्य नाभी म्हणजे काय?

44) बहिर्वक्र आरशाची मुख्य नाभी म्हणजे काय?

45) गोलीय आरशाचे (छिद्र)म्हणजे काय?

46) अपवर्तनांक म्हणजे काय? आरशाचे नाभीय अंतर शोधण्याचे सूत्र लिहा?

47) जेव्हा प्रकाश समान अपवर्तनांक असलेल्या दोन वेगवेगळ्या माध्यमातून जातो तेव्हा त्याचे अपवर्तन होते. का?

48) आयताकृती काचेच्या चिपे मधून प्रकाशाच्या अपवर्तनाच्या प्रयोगात आपाती किरण आणी निर्गत किरण समांतर आहे. का?

49) एखादी वस्तू अनंत अंतरावरून आरशाच्या मुख्य नाभी वर आणली की प्रतिमेच च े स्थान कसे बदलते?

50) बहिर्गोल भिंगाची मुख्य नाभी म्हणजे काय?

51) अंतर्वक्र भिंगाची मुख्य नाभी म्हणज काय?

III खालील प्रश्नांची उत्तरे द्या (२ गुणांचे प्रश्न)

52) प्रकाशाच्या परावर्तनाचे दोन नियम सांगा?

53) एका अंतर्वक्र भिंगाचे नाभीय अंतर ३० सेंमी असते. . भिंगपासून 20 सेंटिमीटर अंतरावर प्रतिमा तयार होण्यासाठी वस्तू भिंगापासून किती अंतरावर ठेवावी? (April २०२१) / June २०२१

54) एखादी वस्तू बहिर्गोल भिंगाच्या खालील स्थानावर ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेची आ कृती काढा? (June २०१९)

I) F 1 आणि २F1 दरम्यान   II) २ F1 वर ठेवल्यावर

55) एका भिंगा पासून वस्तूचे अंतर आणि प्रतिमेचे अंतर अनुक्रमे -30 सेंटिमीटर आणि -10 सेंटिमीटर आहे विशालन आणि वापरलेल्या भिंगाचा प्रकार आणि प्रतिमेचे स्वरूप निश्चित करा.

56) 15 सेंटिमीटर नाभीय अंतर असलेल्या आरशासमोर 25 सेंटिमीटर अंतरावर एक वस्तू ठेवली आहे स्पष्ट प्रतिमा मिळवण्यासाठी आरशापासून

पडता किती अंतरावर उचलावा लागेल?

57) वस्तु अंतर्वक्र भिंगापासून किती अंतरावर ठेवावे जेणेकरून भिंगापासून 10 सेंटी मीटर अंतरावर प्रतिमा तयार होईल

58) 1.50 अपवर्तनांक 1..50 असणारा प्रकाश हवेतून बेंझीनमध्ये प्रवेश करतो तर बेंझीनमधील तीन प्रकाशाचा वेग काढा.(हवेतील प्रकाशाचा वेग3×108मी/से) मार्च 2022

59) 12 सेंटिमीटर नाभीय अंतर असलेल्या अंतर्वक्र भिंगापासून वस्तू किती अंतर ठेवावी जेणेकरून प्रतिमा भिंगापासून नऊ सेंटीमीटर अंतरावर असेल?

60) भिंगाच्या संदर्भात खाली ल संज्ञांचाअर्थ लिहा

I) केंद्रबिंदू ii) अपर्चरच (छिद्र)

61) प्रकाशाचे अपवर्तन म्हणजे काय?स्नेलचा अपवर्तनाचा नियम लिहा

62) बहिर्वक्र आरसा आणि अंतर्वक्र आरसा यामधील कोणतेही दोन फरक लिहा. (जून 2022)

63)गोलाकार आरसे म्हणजे काय ?त्याचे दोन प्रकार लिहा

64) अंतर्वक्र आरशाचे उपयोग लिहा .

65)बहिर्वक्र भिंग आणि अंतर्गोल भिंग त्यांच्यातील कोणतेही दोन फरक लिहा

66)वास्तव आणि आभासी प्रतिमा मधील फरक लिहा .

67)बर्फाचा अपवर्तनांक 11.31 आहे आणि पाण्याचा अपवर्तनक 1. 33आहे प्रकाश कोणत्या माध्यमामध्ये वेगाने प्रवास करतो .

68)गोलाकार आरशामुळे होणाऱ्या परावर्तनाची आकृती काढताना परावर्तनाची स्थिती निश्चित करण्यासाठी विचारात घेता येतील असे दोन किरण सांगा

69) पाण्यात अर्धवट बुडवलेली पेन्सिल विस्थापित का दिसते या घटनेचे नांव काय आहे ?

70) बहिर्वक्र भिंगामुळे होणाऱ्या परावर्तनाचीआकृती काढताना विचारात घेता येतील असे कोणतेही दोन किरण काढा.

71) सपाट आरशातून तयार होणाऱ्या प्रतिमेचे स्वरूप लिहा.

72)दोन पारदर्शक माध्यम P आणि Q च्या आवर्तनांकामधील गुणोत्तर 1.82 आहे आणि माध्यम Q मध्ये प्रकाशाचा वेग 2.25×108 मी सेकंद आहे. मध्यम P मध्ये प्रकाशाचा वेग शोधा(हवेतील प्रकाशाचा वेग C=3*108मीटर)

IV खालील प्रश्नांची उत्तरे द्या (तीन गुणांचे प्रश्न)

73) गोलाकार आरशाने तयार होणाऱ्या प्रतिमेचे विशालन -1 आहे जर हा आरसा 50 सेंटिमीटर अंतरावर असलेल्या वस्तूची प्रतिमा तयार करतो तर

I) आरसा कोणत्या प्रकारचा आहे?

II) वस्तू किती अंतरावर ठेवली आहे?

III) प्रतिमेचे स्वरूप आणि आकार सागा .

74) एखादी वस्तू बहिर्गोल भिंगाच्या खाली स्थानावर ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेची आकृती काढा? (June २०१९) (June २०२४)

I) बिन्दु F1 वर

II) २F1च्या पलीकडे


75) नाभीय अंतर 12 सेंटिमीटर असणाऱ्या अंतर्वक्र आरशाच्या मुख्य अक्षावर वस्तू ठेवली जर ती वस्तू आरशापासून 18 सेंटीमीटर अंतरावर आहे तर प्रतिमेच ेअंतर काढा आरशापासून निर्माण झालेले विशालन काढून तयार होणाऱ्या प्रतिमेचे स्वरूप ओळखा. (April २०२०)

76) जेव्हा बहिर्वक्र भिंगाच्या F1 आणि 2F1यांच्यामध्ये वस्तू ठेवली जाते आकृतीच्या सहाय्याने प्रतिमेचे स्वरूप आणि स्थान लिहा? (April २०२०)

77) एका डॉक्टरने एका व्यक्तीला-०.५Dशक्तीचे भिंग योग्य असल्याचा सल्ला दिला तर भिंगाचे नाभीय अंतर काढा ते भिंग प्रकाशाचे एकत्रिकरण करते किंवा किरणांना पसरविते कारण सांगा डोळ्याच्य ा दोषनिवारणासाठी या भिंगाच्या कोणत्या गुणधर्माचा उपयोग कसा होतो?

78) अ) प्रकाशाच्या अपवर्तनाचे नियम स्पष्ट करा.

ब) दिलेल्या आकृतीत AB आपाती किरण BC हा अपवर्तित किरण आणि MN ही आपाती बिंदूवर काढलेली स्तंभिका आहे कोणते माध्यम जास्त घनतेचे आहे का? (September २०२०)



79) गोलाकार अरशासाठी कोणतेही तीन नवीन कार्टेशियन चिन्ह संकेत लिहा?

80) एखादी वस्तू अंतर्वक्र आरशासमोरC आणि F मध्ये ठेवल्यावर तयार होणाऱ्य ा प्रतिमेची आकृती काढा आकृतीच्या मदतीने प्रतिमेचे स्थान आणि स्वरूप शोधा?

81) एखादी वस्तू अंतर्वक्र आरशासमोर Cवर ठेवल्यावर तयार होणाऱ्य ा प्रतिमेची आकृति काढा आकृतीच्या मदतीने प्रतिमेचे स्थान आणि स्वरूप शोधा?

82) एखादी वस्तू Cच्यापलीकडे अंतर्वक्र आरशासमोर ठेवली की तयार होणाया प्रतिमेची आकृती काढा आकृतीच्या मदतीने प्रतिमेचे स्थान आणि स्वरूप शोधा?

83) एखादी वस्तू अंतर्वक्र आरशासमोर F वर ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेची आकृती काढा

आकृतीच्या मदतीने प्रति म ेचे स्थान आणि स्वरूप शोधा? (F=आरशाच ी मुख्य नाभी C=आरशाच्या वक्रतेचे केंद्र)

84)एखादी वस्तू अंतर्वक्र आरशासमोर F आणि P च्या ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेची आकृती काढा. आकृतीच्या मदतीने प्रतिमेचे स्थान आणि स्वरूप शोधा

(F आरशाचा मुख्य नाभी ;P हा आरशाचा मध्य आहे) (A)

85) बहिर्गोल भिंगासमोर F1आणि O च्या मध्ये वस्तु ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेचे आकृती आणि स्थान स्वरूप काढा

86) जर बहिर्वक्र आरशाने तयार होणारे प्रतिमेचे विशालन 0.5 असेल आणि वस्तू आरशापासून 15सेमी अंतरावर असेल ,तर बहिर्वक्र आरशाची नाभीय अंतरशोधा आणि प्रतिमेचे स्वरूप आणि आकार लिहा(अ)

87)समांतर प्रकाश किरणांचे एकत्रीकरण करणाऱ्या बहिर्वक्र भिंगाची क्रिया स्पष्ट करा (अ)

88) आंतर्वक्र आरशाची अंदाजे नाभीय अंतर शोधण्याची क्रिया स्पष्ट करा(अ)

v. खालील प्रश्नांची उत्तरे द्या(चार गुणांचे प्रश्न)

89) आयताकृती काचेचा चिपेमधून होणारे प्रकाशाचे अपवर्तन स्पष्ट करा. (D)

90) एखादी वस्तू बहिर्गोल भिंगाच्या खालील स्थानावर ठेवल्यावर तयार होणाऱ्या प्रतिमेची आकृती काढा प्रतिमेचे अंतर , प्रतिमेचे स्वरूप आणि आकार लिहा. (D)

2F1वर

10 मानवी डोळा आणि रंगीबेरंगी जग

अध्ययन अंश:

➤ मानवी डोळा

➤ डोळ्याची समायोजन क्षमता

➤ दृष्टीदोष आणि त्याचे निराकरण

➤ काचेच्या चिपेतून होणारे प्रकाशाचे अपवर्तन

➤ प्रकाशाचे विखूरणे - टिंडाल परिणाम, स्वच्छ अकाशाचा रंग निळा का असतो?

काठिण्य पातळीचा स्तर

अ.क्र.	काठिण्य स्तर	प्रश्नांची संख्या	गुण	टक्केवारी
1	Easy	२२	२७	३०%
2	Average	२६	४६	५०%
3	Difficult	०९	१८	२०%

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी फक्त एकच योग्य किंवा सर्वात योग्य आहे. योग्य पर्याय निवडा आणि अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1. डोळ्याच्या कोणत्या भागामध्ये प्रतिमा तयार होते ? [E]

A. नेत्रपटल B. दृष्टिपटल C. कनिनिका D. भिंग

2. वस्तूची उलट आणि वास्तव प्रतिमा तयार करणारा डोळ्याचा भाग [E]

A. डोळ्याचे भिंग B. बाहुली C. कनिनिका D. नेत्रपटल

3. निकट दृष्टीदोषाचे निराकरण करण्यासाठी वापरले जाणारे भिंग - [E]

A. द्विबहिर्वक्र भिंग B. समतल बहिर्वक्र भिंग C. अंतर्वक्र भिंग D. यापैकी नाही

4. वृद्धापकाळात, कधी कधी डोळ्याचे भिंग दुधासारखे पांढरट आणि धूसर होते. हा दोष कोणता? [E]

A. दूरदृष्टी B.ऱ्हवदृष्टी C. वृद्धदृष्टी D. मोतीबिंदू

5. एखाद्या व्यक्तीला फक्त ४० सेंमी ते ८० सेंमी दरम्यानची वस्तू स्पष्ट दिसते, तर तिला कोणता दोष आहे? [A]

A.ऱ्हस्वदृष्टी आणि अंतर्वक्र भिंग वापरणे B. दिर्घदृष्टी दोष आणि बहिर्वक्र भिंग वापरणे

C. वृद्धदृष्टी आणि द्विभिंग वापरणे D. डोळ्याची शस्त्रक्रिया करणे

6. डोळ्याच्या भिंगाचे नाभीय अंतर बदलणारी रचना कोणती? [E]

A. आलंबन बंध B. पापणी C. दृष्टिपटल D. पडदा

7. प्रत्यक्ष सूर्योदयाच्याआदी आणि प्रत्यक्ष सूर्यास्तानंतर दोन मिनिटे सूर्य का दिसतो? [A]

A. प्रकाशाचे अपवर्तन B. प्रकाशाचे परावर्तन

C. प्रकाशाचे विखुरणे D. प्रकाशाचे पृथ:करण

8. चंद्राच्या पृष्ठभागावरून आकाशाचा रंग कसा दिसतो? [A]

A. निळा B. लाल C. काळा D. जांभळा

9. काचेच्या लोलका मध्ये सर्वात कमी वाकणारा रंग कोणता? [A]

A. जांभळा B. निळा C. हिरवा D. लाल

10. दूरच्या वस्तू पाहताना डोळ्यात कोणता बदल होतो? [A]

A. डोळ्यांच्या भिंगाचे नाभीय अंतर कमी होते

B. भिंगाची वक्रता वाढते

C. डोळ्यांच्या भिंगाचे नाभीय अंतर वाढते

D. समायोजी स्नायू शिथिल होतात

11. प्रकाशाचे विखुरणे आणि कणांच्या आकाराबाबत योग्य विधान कोणते? April 2024 [A]

A. छोटे कण लाल प्रकाश विखुरतात.

B. मोठे कण निळा प्रकाश विखुरतात.

C. मोठे कण जांभळा प्रकाश विखुरतात.

D. खूप मोठे कण सर्व रंग सारखेच विखुरतात.

12. डोळ्याच्या दृकपटलावर तयार होणाऱ्या प्रतिमेचे स्वरुप कसे असते? (March 2023) [M]

A. वास्तव व उलट B. आभासी व सरळ

C. वास्तव व सरळ D. आभासी व उलट

13. धुके व धूरामधून सर्वात कमी विखुरणारा रंग कोणता? [E]

A. केशरी B. निळा C. लाल D. जांभळा

14. खालीलपैकी प्रकाशाचे अपवर्तन व प्रकाशाचे पृथ:करण विषयी चुकीचे विधान ओळखा. June 2024 [A]

A. तारे चमकतात

B. खूप उंचीवर जाणाऱ्या अंतराळवीराला आकाश निळे दिसते

C. प्रत्यक्ष सूर्योदयापूर्वी सुमारे दोन मिनिटे सूर्य आपल्याला दिसतो

D. ग्रह चमकत नाहीत

II. पुढील प्रश्नांची उत्तरे द्या (प्रत्येकी एक गुण)

15. डोळ्याचा जवळचा बिंदू म्हणजे काय? सामान्य डोळ्याचा जवळचा बिंदू किती? [E]

16. डोळ्याचा दूरचा बिंदू म्हणजे काय ? सामान्य डोळ्याचा दूरचा बिंदू किती? [E]

17. पांढऱ्या प्रकाशाचा वर्णपट म्हणजे काय ? [E]

18. सामान्य दृष्टीदोष कोणते ? [E]

20. लोलकाचा कोन म्हणजे काय ? [E]


21. निर्गत कोन म्हणजे काय ? [E]

22. डोळ्याच्या खालील भागांची नावे लिहा: [E

अ) हे बुबुळाच्या समोरच्या भागामध्ये पारदर्शक फुगीर भाग तयार करते.


ब) हा एक गडद स्नायूंचा पडदा आहे.

23. चित्रात दिलेला डोळाचा दोष ओळखा आणि त्यावरील उपाय लिहा. [A]



24. प्रकाशाचे पृथ:करण म्हणजे काय ? [E]

25. ही घटना चंद्रावर दिसते का ? तुमच्या उत्तराचे समर्थन करा. [D]



26. सामान्य दृष्टी असलेल्या व्यक्तीचा जवळचा बिंदू व दूरचा बिंदू म्हणजे काय ?

June 2019 , March 2024 [A]

27. प्रकाशाच्या अपवर्तनामुळे घडणाऱ्या या दोन वातावरणीय घटनांची नावे लिहा.

March 2019 , 2024 [E]

28. डोळ्याचे समायोजन शक्ती म्हणजे काय? June 2019 [E]

29. धोक्याच्या चिन्हांसाठी कोणता रंग वापरला जातो आणि का? [म]


30. मागील बाकावर बसलेला विद्यार्थ्याला फळ्यावरील वाचण्यात अडचण वाटते. हा दोष कोणता आणि तो दोष कसा दूर करता येतो? June 2024 [D]

31. चित्रात दिलेला डोळ्याचा दोष ओळखा आणि त्यावर उपाय सुचवा. [A]



32. मानवी डोळ्यातील बाहुलीचे कार्य कोणते ? June 2019 [A]

33. खालील आकृती लोलकातुन होणारे प्रकाशाचे अपवर्तन दर्शविते. [D]




आकृतीतील कोन ओळखा आणि तो निर्माण होण्याची कारणे लिहा.

34. मोतीबिंदू म्हणजे काय? [E]

35. लोलकामध्ये प्रकाश विभाजित झाल्यानंतर, सर्वात कमी वाकणारा रंग आणि सर्वात जास्त वाकणारा रंग कोणता ? [E]

36. खाली दाखविल्याप्रमाणे A, B आणि C हे काचेचे **लोलक** लावलेले आहेत. जर पांढऱ्या प्रकाशाचा किरण **लोलक** A मधून जाऊ दिला तर पडद्यावर प्रकाशाचा वर्णपट दिसेल का? कारण द्या. चित्र: (A, B, C लोलक आणि पडदा)



III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या (२ गुण)

36. दूर दृष्टिदोष म्हणजे काय? त्याची कारणे सांगा. (June 2019) [E]

38.निकट दृष्टिदोष म्हणजे काय? त्याची कारणे सांगा. [A]


39. निसर्गात इंद्रधनुष्याची निर्मिती कशी होते ते स्पष्ट करा. (March 2023, April 2025) [A]

40. न्यूटनने पांढरा प्रकाश सात रंगांचा असतो हे सिद्ध करण्यासाठी कोणता प्रयोग केला तो स्पष्ट करा. [E]

41. न्यूटनने पांढऱ्या प्रकाशाचे पुनर्मिश्रण दाखवण्यासाठी कोणता प्रयोग केला ते स्पष्ट करा.
(March 2020, April 2025) [E]

42. निकट दृष्टिदोष असणारा डोळा आणि दूर दृष्टिदोष असणारा डोळा यामधिल फरक सांगा.
(April 2025) [E]

43. आकृतीमधील डोळ्याचा दोष ओळखा व कारणासहित स्पष्टीकरण द्या: सामान्य, निकट दृष्टितादोष (मायोपिया), दूर दृष्टितादोष (हायपरमेट्रोपिया) [A]




44. दृष्टिदोष असणारी एक व्यक्ती – 0.5 D सामर्थ असणारे भिंग खरेदी करते. दोषासाठी कोणते भिंग योग्य आहे? विश्लेषण करा. (April 2024) [D]

45. मानवी डोळ्यातील भिंग जवळच्या व दूरच्या वस्तू पाहण्यासाठी स्वतःला कसे समायोजित करते ते स्पष्ट करा. (March 2023, June 2023, August 2024) [E]

46. दिलेली आकृती पाहा. त्यामध्ये दाखवलेला डोळ्याचा दोष ओळखा.

(March 2019, March 2023) [A]



a) प्रेसबायोपिया

b) दूर दृष्टिदोष (

c) निकट दृष्टिदोष

d) मोतीबिंदू

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (तीन गुण)

47. टिंड◌ाल परिण◌ाम म्हणजे काय? दोन उदाहरणे द्या. [E]

48. आकाश निळे का दिसते? स्पष्ट करा. [E]

49. पांढऱ्या प्रकाशाच्या पुनर्मिश्रणाचे चित्र काढा. (June 2024) [E]

50. तारे लुकलुकतात पण ग्रह लुकलुकत नाहीत, असे का? स्पष्ट करा. (August 2024) [E]

51. प्रेसबायोपिया म्हणजे काय? त्याची कारणे व उपाय सांगा. [E]

52. डॉक्टर - 0.5 D शक्तीचे भिंग लिहून देतो. त्याचे नाभीय अंतर शोधा. हे भिंग अभिसारी आहे की अपसारी? स्पष्ट करा. अंतर्वक्र भिंग हा दृष्टिदोष कसे दूर करते ते सांगा. (March 2020) [d]

53. a) आपण २५ सेमी पेक्षा जवळील वस्तू स्पष्ट पाहू शकत नाही, का ? [D]

b) वायुमंडलातील प्रकाशाचा रंग आणि कणांच्या आकाराच्या संबंधाचे स्पष्टीकरण द्या.

54.1) a) दुपारी सूर्यकिरण टक्कल पडलेल्या भागावर पांढरे का दिसतात? [D]

b) मानवी डोळ्याचे कार्यतत्त्व काय आहे?

२) खालील प्रत्येकाचे मुख्य कार्य लिहा:


a) कननिका

b) बाहुली

c) पूरकपटल

55. खालील आकृतीप्रमाणे पांढऱ्या प्रकाशाचा किरण PQ एका काचेच्या लोलकामधून जातो

. आकृती पुन्हा काढून DE पडद्यावर दिसणारा प्रकाश किरण दाखवा. [D]



a) येथे दिसणारी घटना ओळखा.

b) या घटनेचे कारण लिहा.

V. खालील प्रश्नांची उत्तरे द्या (चार गुण)

56. a) वातावरणात इंद्रधनुष्य निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगा. (March 2020) [A]

b) तारे लुकलुकताना दिसतात. का?

57. a) निकट दृष्टिदोष (मायोपिया) म्हणजे काय? या दोषाची कारणे काय आहेत? हा दोष कसा दूर करता येतो? [E]

b) डोळ्याची समायोजन शक्ती म्हणजे काय? दूरची वस्तू पाहताना डोळ्यात कोणते बदल होतात?

(May 2025)

प्रकरण-13 आपले पर्यावरण

अध्ययन अंश:

- परिसंस्था - त्याचे घटक काय आहे
- अन्न साखळ्या आणि अन्न जाळी
- आपली कृती पर्यावरणावर कशी परिणाम करते
- ओझोन स्तर आणि तो कसा कमी होत आहे
- कचरा व्यवस्थापन

काठिण्य पातळीचा स्तर

अ.क्र.	काठिण्य स्तर	प्रश्नांची संख्या	गुण	टक्केवारी
1	Easy	1२	21	30%
2	Average	23	35	50%
3	Difficult	09	14	20%

बहुपर्यायी प्रश्न:
प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिले आहेत. फक्त एकच पर्याय योग्य आहे.
योग्य पर्याय निवडा आणि पूर्ण उत्तर लिहा.

1. खालील अन्न साखळी पहा: Sept. 2019 [D]

गवत → टोळ → बेडूक → साप → गरुड

जर पहिल्या पोषक स्तरावर 5000 J ऊर्जा उपलब्ध असेल, तर सापासाठी ऊर्जा किती असेल?

A. 50 J B. 5 J C. 0.5 J D. 50 J

2. खालीलपैकी जैविकविघटनशील पदार्थांबद्दल योग्य विधान कोणते? March 2021 [A]

A.पर्यावरणात नैसर्गिकरित्या पुनचक्रीत होतात

B. परीसंस्थेतील विविध सजीवाना हानी पोहचवतो.

C.विविध पोषक स्तरामध्ये हानिकारक रसायनाची तिव्रता वाढवितो.

D.दिर्घ काळासाठी पर्यावरणात स्थिर रहातो.

3. ज्या वस्तू पर्यावरणात हळूहळू विघटित होतात त्या कोणत्या? [E]

A.वनस्पतींचे तंतू B. C. वापरलेले कागद D. वापरलेली चहाची पा

4. वातावरणातील कोणता स्तर सूर्यकिरणांमधून येणारे अतिनील किरण शोषून घेतो?

March 2022 [A]

A.ओझोन (O3) B.नायट्रोजन C. हायड्रोजन D. ऑक्सिजन

5. कोणत्याही अन्न साखळीतील प्राथमिक उपभोक्तानेहमी कोण असतात? SUP 2022 [A]

A . मांसाहारी B. शाकाहारी C. उच्च मांसाहारी D. उत्पादक

6. जलीय परिसंस्थेतील उत्पादक कोणते? SUP 2023 [A]

A.शेवाळ B. लहान मासे C. अदिजीव (प्रोटोझोआ)आळ्या D. प्रोटोझोआ

7. अन्न साखळीतील दुसरा पोषकस्तर कोणता असतो? [A]

A. उत्पादक B. शाकाहारी C. द्वितीय उपभोक्ता D. प्रथम मांसाहारी

8. शेवाळ → लहान कीटक → मोठे कीटक → लहान मासे → मोठे मासे → मानव

हअन्न साखळी वाढत्या हानीकारक रसायनांच्या साठ्याच्या क्रमाने आहे. Model-4 [A]

A. ऊर्जा उपलब्धतेच्या वाढत्या क्रमाने

B. ऊर्जा आणि घातक रसायन संचय दोन्हीच्या वाढत्या क्रमाने

C. घातक रसायन संचयाच्या वाढत्या क्रमाने

D) उर्जा आणि घातक रसायन संचय या दोन्हींच्या उतरत्या क्रमाने

9. खालीलपैकी कोणत्या गटामध्ये केवळ जैविक विघटनशील पदार्थ आहेत? [A]

A. गवत, फुले आणि कातडी

B. गवत, लाकूड आणि प्लास्टिक

C. फळांच्या साली, केक आणि लिंबू रस

D. केक, झाड आणि गवत

10. खालीलपैकी कोणते अन्न साखळी तयार करू शकते? [A]

A. गवत, गहू आणि आंबा

B. गवत, शेळी आणि माणूस

C. शेळी, गवा आणि हत्ती

D. गवत, मासे आणि शेळी

11. खालीलपैकी कोणते पर्यावरणपूरक व्यवहार आहेत? [D]

A. खरेदी केलेल्या वस्तू ठेवण्यासाठी कापडी पिशव्या नेणे.

B. विजेचे दिवे आणि पंखे बंद करणे.

C. शाळेत आईच्या दुचाकीऐवजी चालत जाणे.

D. वरील सर्व

12. परिसंस्थेमधील ऊर्जा प्रवाह एकाच दिशेने असतो. [A]

A. उपभोक्ता प्राण्यांची संख्या स्थिर असते

B. सजीवांची संख्या कमी असते

C. उपलब्ध ऊर्जा उपभोक्त्याद्वारे पूर्णतः वापरली जाते

D. खर्च होणारी ऊर्जा उपलब्ध ऊर्जेपेक्षा जास्त असते

II. एक गुणांचे प्रश्न उत्तर द्या:

13. सूक्ष्मजीव जसे की जिवाणूंना विघटक का म्हणतात? SUP 2019 [A]

14. परिसंस्थेमध्ये विघटकांचे कार्य काय आहे? April 2022 [A]

15. सध्या CFC विरहित फ्रिज बनवले जात आहेत. का? SUP 2022 [D]

16. जैविक मग्निफिकेशन म्हणजे काय? Sup2022-23 [E]

17. "ओझोन हा विषारी वायू असला तरीही पृथ्वीवर जीवनासाठी आवश्यक आहे" हे विधान स्पष्ट करा.

2024 Exam 1 [E]

18. "परिसंस्थेमध्ये अन्नसाखळीत उच्च पोषक स्तरात असलेल्या सजीवांची संख्या कमी होते" का?

2024 Exam [A]

19. अन्न साखळी म्हणजे काय? [E]

20. ऊर्जेचा१०% नियम सांगा. [E]

21. फ्रिजमध्ये CFC चा वापर करण्यास प्रतिबंध का केला जातो ? [A]

III. दोन गुणांचे प्रश्न:

22. प्रदूषित जलीय परिसंस्थेतील अन्नसाखळी दिली आहे. निरीक्षण करा. Main 2019 [A]

ताजे पाणी -> शैवळ -> मासे -> पक्षी

(i) जैविक मॅग्निफिकेशनमुळे कोणते जीव बाधित होतात? का?

(ii)जैविक मॅग्निफिकेशनमुळे ही परिसंस्था हळूहळू नष्ट का होईल?

23. एखाद्या विद्यार्थ्याने काकडीचा तुकडा, काचेचा तुकडा, केळ्याची साल आणि प्लास्टिक पेन एका खड्ड्यात ठेवले. एका महिन्यानंतर त्यामध्ये कोणते बदल दिसून येतील? वैज्ञानिक कारण द्या.

Main – 2019 [D]

24. "जशी ऊर्जा अन्नसाखळीच्या विविध पोषक स्तरांमधून जाते तशी ती मागील पातळीला उपलब्ध राहत नाही" याचे कारण सांगा. Main -2020 [D]

25. अविघटनशील पदार्थांमुळे पर्यावरणावर होणारे दोन परिणाम सांगा. SUP2022 [E]

26. कचरा टाकताना निर्माण होणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी दोन उपाय सांगा. [E]

27. गवताळ परिसंस्थेतील अन्नसाखळीचे उदाहरण द्या. जर दुसऱ्या पोषक स्तरातील सजीवांची संख्या वाढली तर त्याचा परिणाम काय होईल? Main-2023 [A]

28. जलीय परिसंस्थेमध्ये मासे इ. सजीव अंतिम उपभोक्ता म्हणून असतात. जर १० कॅलरी ऊर्जा अंतिम स्तराला उपलब्ध असेल, तर पहिल्या स्तराला किती ऊर्जा उपलब्ध झाली असेल? 2024- Exam-2 [A]

29. दिलेल्या अन्न साखळीचे निरीक्षण करा:

हिरवी वनस्पती -> हरिण -> वाघ

i) वाघाला ७०० किलो ज्यूल ऊर्जा मिळाल्यास हिरव्या वनस्पतींमध्ये किती ऊर्जा असेल?

ii) कोणत्या ट्रॉफिक स्तरातील सजीवांमध्ये हानिकारक रसायनांचे सर्वाधिक साचून राहणे होते? का? [E]

30. खालील सजीव वापरून अन्न साखळी तयार करा : साप, बेडूक, गवत, टोळ. या अन्न साखळीमध्ये सर्वाधिक हानिकारक रसायन साचून राहणारा सजीव कोणता? का? 2024 Exam-3 [A]

31. अजैविक पदार्थांचा वापर टाळावा. का? 2025 Model -1 [A]

32. ओझोन थर कसा तयार होतो? ओझोन थराचे रक्षण करणे का आवश्यक आहे? 2025 model-1 [D]

33. पर्यावरणावर जैविक अपघटनशील पदार्थांचा परिणाम लिहा. [E]

34. अन्न साखळी सामान्यतः फक्त तीन किंवा चार स्तरांची का असते? [D]

35. जर एखाद्या पोषक स्तरातील सर्व सजीव नष्ट झाले, तर काय होईल? किंवा भिन्न पोषक स्तरांमधील सजीव नष्ट झाल्यास प्रत्येक पोषक स्तरावर काय वेगळा परिणाम असेल? [D]

36. जर सर्व कचरा जैविक विघटनशील असता, तर पर्यावरणावर परिणाम झाला नसता का? [D]

37. ओझोन स्तरात छिद्र पडणे ही चिंतेची गोष्ट का आहे? त्यावर उपाय कोणते? [A]

38. कचरा कमी करण्यासाठी आपण काय करू शकतो? दोन उपाय सांगा. [A]

39. परिसंस्था म्हणजे काय? तिचे घटक कोणते? [A]

40. अन्न साखळ्यांमध्ये परस्परसंबंध का असतो? [A]

41. अन्न साखळीमध्ये ऊर्जा कशी वाहते? [A]

III. खालील तीन गुणांचे प्रश्न सोडवा:

42. कारणे द्या: [A]

a) अन्न साखळीमध्ये सामान्यतः तीन ते चारच पोषक स्तर असतात.

b) विघटक परिसंस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. SUP 2020

c) ओझोन थराचे रक्षण करणे आवश्यक आहे.

43. पोषक स्तर म्हणजे काय? परिसंस्थेमधील ऊर्जा प्रवाह एकच दिशेने का असतो? स्पष्ट करा. Main 2022 [A]

44. जैविक विघटनशील व जैविक अविघटनशील पदार्थांमधील फरक सांगा. [A]

उत्तरे

1. रासायनिक क्रिया आणि समीकरणे

1.C. लोखंडाचे गंजणे

2.C.आकारात बदल

3.C..विस्थापन अभिक्रिया

4.A.$BaCl_2$ व Na_2SO_4

5.C उष्णताजनक अभिक्रिया

6.C.दुहेरी विस्थापन अभिक्रिया

7.B. H_2 + CuO

8.A. सिल्वर क्लोराइड चे विघटन होऊन चांदी बनते.

9.C. हायड्रोजन व ऑक्सिजन :: 2:1

10.C.उष्णता जनक

11. B.हायड्रोजन

12. C.$Ag(NO_3)_2 + Cu \longrightarrow Cu(NO_3)_2 + Ag$

13.A हायड्रोजन वायू व आयर्न क्लोराइड तयार होते.

14.D.लोखंड

15.B.पाण्याचे रेणू गमावले जातात.

16. B.ऑक्सिडेशन रोखण्यासाठी

II .एका वाक्यातील उत्तरे

17. रासायनिक बदल घडताना एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाबरोबर क्रिया केल्यामुळे त्याच्या गुणधर्मात बदल घडून नवीन पदार्थ तयार होतो त्या क्रियेला रासायनिक अभिक्रिया असे

18. रासायनिक क्रियांचे प्रतीकात्मक रूप जे अभिक्रिया कारक व उत्पादिते वापरून दर्शविले जाते त्याला रासायनिक समीकरण असे म्हणतात.

19. मॅग्नेशियमच्या फीतवर ऑक्साईडचा थर असतो तो काढण्यासाठी ब्लेडने किंवा सॅड पेपरने घासतात .

20. रासायनिक अभिक्रियेमध्ये उत्पादितांचे वस्तुमान अभिक्रिया कारकांच्या वस्तुमाना इतकेच असते. रासायनिक अभिक्रिया पूर्वी व नंतर मूलद्रव्यांच्या अणूंची संख्या समान करण्यासाठी समीकरण संतुलित करण्याची गरज असते.

21. या दोन्ही क्रियेमध्ये उष्णता मुक्त होते म्हणून, या क्रिया उष्मादायी आहेत

22 .अभिक्रियेमध्ये अवक्षेपाची निर्मिती होते त्या क्रियेला अवक्षेप अभिक्रिया म्हणतात.

$Na_2SO_4 + BaCl_2 \longrightarrow BaSO_4 + 2NaCl$

23. जेव्हा एखादा पदार्थावर किंवा धातूवर आर्द्रता आम्ल इत्यादीत पदार्थांचा परिणाम किंवा आघात होतो तेव्हा त्यांची झीज होते त्यालाच गंज असे म्हणतात

24. चिप्सचे ऑक्सिडेशन होऊ नये म्हणून

25. लोखंडाला गंजण्यापासून रोखण्यासाठी रंग लावतात.

26. जेव्हा स्निग्ध किंवा तेलकट पदार्थांचे ऑक्सिडेशन होऊन ते खराब होतात

त्यांचा वास रंग व चव बदलते त्याला खवटपणा म्हणतात.

27. हवाबंद डब्यामध्ये भरणे नायट्रोजन वायू मध्ये पॅक करणे

28.ZnO चे क्षपण व C चे ऑक्सिडेशन

29.SO_4 आणि Ba^{+2} आयन

30. कॅल्शियम हायड्रॉक्साइड

31. संयोग किंवा ऑक्सिडेशन

III दोन वाक्यात उत्तरे .

32. भौतिक अवस्थेमध्ये बदल रंगांमध्ये बदल वायू मुक्त होणे तापमानामध्ये बदल

33. ज्या अभिक्रियेमध्ये दोन किंवा जास्त अभिक्रिया कारकांचा संयोग होऊन एकच उत्पादित मिळते त्याला संयोग अभिक्रिया म्हणतात.

$2Mg + O_2 \longrightarrow 2MgO$

34. ज्या अभिक्रियेमध्ये एकाच अभिक्रिया कारकाचे अपघटन होऊन साध्या

उत्पादितमध्ये रूपांतर होते त्यालाच अपघटन म्हणतात.

$CaCO_3 \xrightarrow{\text{उष्णता}} CaO + CO_2$

35. ज्या अभिक्रियेमध्ये जास्त क्रियाशील मूलद्रव्य कमी क्रियाशील मूलद्रव्याला विस्थापित करते त्याला विस्थापन अभिक्रिया म्हणतात.

$CuSO_4 + Fe \longrightarrow FeSO_4 + Cu$

36. लोखंड तांब्याला विस्थापित करते म्हणून द्रावणाचा रंग बदलतो.

$CuSO_4 + Fe \longrightarrow FeSO_4 + Cu$

37. नाही कारण लोखंड जास्त क्रियाशील आहे त्यामुळे ते तांब्याला विस्थापित करते.

38. ज्या अभिक्रियेमध्ये अभिक्रियाकामधील आयनांची अदलाबदल होऊन उत्पादितांची निर्मिती होते त्या क्रियेला दुहेरी विस्थापन अभिक्रिया म्हणतात.

$Na_2SO_4 + BaCl_2 \longrightarrow BaSO_4 + 2NaCl$

39.पिवळा रंग

लेड आयडॉईड-- अवक्षेप

दुहेरी विस्थापन अभिक्रिया

तपकिरी वाफा 40.

$2Pb(NO_3)_2 \xrightarrow{\text{उष्णता}} 2PbO + 4NO_2 + O_2$

41. ज्या अभिक्रियेमध्ये उष्णता निर्माण होऊन उत्पादितांची निर्मिती होते त्या क्रियेला उष्णताजनक अभिक्रिया म्हणतात.

$CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$

ज्या अभिक्रियेमध्ये उष्णता शोषली जाते किंवा ग्रहण केली जाते त्या क्रियेला उष्णता शोषक अभिक्रिया म्हणतात.

$CH_4 + 2O_2 \longrightarrow CO_2 + 2H_2O$

42. औष्णिक अपघटन

$CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$

43. ज्या अभिक्रियेच्या वेळी एक अभिक्रिया कारक ऑक्सिडीकारक असतो त्याचवेळी दुसरा क्षपणक असतो अशा अभिक्रियेला ऑक्सिडेशन आणि क्षपण अभिक्रिया किंवा रीडॉक्स अभिक्रिया म्हणतात.

$ZnO + C \longrightarrow Zn + CO$

44..या अभिक्रियेमध्ये अभिक्रियाकारकांमधील आयनांची अदलाबदल होते म्हणून या क्रियेला दुहेरी विस्थापन अभिक्रिया म्हणतात.

$Na_2SO_4 + BaCl_2 \longrightarrow BaSO_4 + 2NaCl$

45.औष्णिक अपघटन अभिक्रिया

$CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$

46.. रंग लावणे

ग्रीस लावणे

विद्युत विलेपन

संमिश्र बनविणे


47. i.X---- तांबे

iI.Y कॉपर ऑक्साईड CuO

48.Fe कारण लोखंड जास्त क्रियाशील असल्याने तांब्याला विस्थापित करते.

$FeSO_4$

49.



IV. तीन ते चार वाक्यात उत्तरे

50.i. बेरियम सल्फेट BaSO4

ii.SO_4 आणि Ba^{+2}

iii.दुहेरी विस्थापन क्रिया

51. A आणि C मध्ये रासायनिक अभिक्रिया होते कारण लोह हे जस्त व मॅग्नेशियम पेक्षा कमी क्रियाशील असल्यामुळे विस्थापित होते.

$Zn + FeSO_4. \longrightarrow ZnSO_4 + Fe$

$Mg. + FeSO_4 \dashrightarrow MgSO_4 + Fe$

52.जी अपघटन क्रिया उष्णता देऊन घडवली जाते त्या अभिक्रियेला त्या क्रियेला औष्णिक अपघटन म्हणतात

$CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$.

जी अपघटन अभिक्रिया सूर्यप्रकाशाच्या सानिध्यात घडते तिला प्रकाशीय अपघटन म्हणतात .

$2AgCl \longrightarrow 2Ag + Cl_2$

जी अपघटन अभिक्रिया विद्युत ऊर्जा पुरूवून घडविली जाते तिला विद्युत अपघटन म्हणतात.

$2H_2 + O_2 \longrightarrow 2H_2O$

53. सिल्वर क्लोराइड आणि सिल्वर ब्रोमाइड

$2AgCl \longrightarrow 2Ag + Cl_2$

$2AgBr \longrightarrow 2Ag + Br_2$

54.Z----- कॅल्शियम ऑक्साईड

रेणुसूत्र CaO

$CaO + H_2O \longrightarrow Ca(OH)_2$

55. विस्थापन अभिक्रिया लोह तांब्यापेक्षा जास्त क्रियाशील असल्यामुळे ते तांब्याला विस्थापित करते.

$CuSO_4 + Fe \longrightarrow FeSO_4 + Cu$

56. दुहेरी विस्थापन अभिक्रिया अभिक्रिया कारकांमधील आयनांची परस्पर देवाणघेवाण होते किंवा अदलाबदल होते.

$BaCl_2 + Al_2(SO_4)_2 \longrightarrow 3BaSO_4 + 2AlCl_3$

57.i. $CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$

ii. $H_2 + 2Cl \longrightarrow 2HCl$

iii. Mg + 2HCl ---- $MgCl_2$ + H2

58. i. $2H_2 + O_2 \longrightarrow 2H_2O$

ii. $Na_2CO_3 + 2HCl \longrightarrow 2NaCl + H_2O + CO_2$

iii. $N_2 + 3H_2 \longrightarrow 2NH_3$

59.i. $CaO + H_2O \longrightarrow Ca(OH)_2$

ii. $CuSO_4 + Zn \longrightarrow ZnSO_4 + Cu$

iii .$2K + 2H_2O \longrightarrow 2KOH + H_2$

60) i) $2H_2S + 3O_2 \longrightarrow SO_2 + 2H_2O$

ii) $3BaCl_2 + Al_2(SO_4)_3 \longrightarrow 3BaSO_4 + 2AlCl_3$

iii. $2K + 2H_2O \longrightarrow 2KOH + H_2$

61.i $CH_4 + 2O_2 \longrightarrow CO_2 + 2H_2O$

ii. $2K + 2H_2O \longrightarrow 2KOH$ + H2

iii. $CuSO_4 + Fe \longrightarrow FeSO_4 + Cu$

62. जर रासायनिक क्रियेच्या वेळी पदार्थाने ऑक्सिजन घेतला तर त्याला ऑक्सिडेशन म्हणतात .

$2Cu + O_2 \longrightarrow 2CuO$

जर रासायनिक याच्या वेळी पदार्थाने ऑक्सिजन गमावला तर त्याला क्षपण म्हणतात.

$2MgO \longrightarrow 2Mg + O_2$

चार वाक्यातील उत्तरे

63. $2Pb(NO_3)_2 + 2KI \longrightarrow PbI_2 + 2KNO_3$

ii.PbI_2 लेड आयोडाईड

iii. पिवळा रंग

iv.दुहेरी विस्थापन अभिक्रिया

64.i $2H_2 + O_2 \dashrightarrow 2H_2O$

ii. $ZnSO_4 + Fe \longrightarrow FeSO_4 + Zn$

iii.$ZnCO_3 \longrightarrow ZnO + CO_2$

iv. $NaCl + AgNO_3 \longrightarrow NaNO_3 + AgCl$

65अ.i.$CaCO_3 \longrightarrow CaO + CO_2$

ii.$CH_4 + 2O_2 \longrightarrow CO_2 + 2H_2O$

ब.तांब्याच्या वस्तू हवेतल्या व ऑक्सिजन बरोबर क्रिया करून तांब्याचे ऑक्साईड किंवा तांब्याचे कार्बोनेट तयार करतात त्यामुळे तांब्याच्या वस्तूंची चकाकी किंवा चमक थोडी कमी होते .

विस्थापन अभिक्रिया आहे कारण लोखंड तांब्या पेक्षा जास्त क्रियाशील असल्यामुळे त्याला विस्थापित करते

2. आम्ल, अल्कली आणि क्षार

उत्तरे

एका वाक्यातील उत्तरे

1.C NaOH + H_2SO4 ⟶ Na_2SO_4 + $2H_2O$

2.A .अल्कली गुणधर्म वाढतो आणि OH^- आयन्स ची संख्या वाढते

3A..अल्युमिनियम ऑक्साईड

4.A. कार्बन डाय ऑक्साइड-

5.D.जाठर रस

6.A.मेथेनाईक आम्ल

7.A.सोडियम कार्बोनेट

8.A. 0 ते 7

9. D.आम्लीयता वाढते

10C.हायड्रोजन वायू

11.C.धातूच्या ऑक्साईड आणि हायड्रोजन वायू

12. B.$Ca(OH)_2$

13.C.कॉपर हायड्रॉक्साइड .

14. A.उष्णता जनक क्रियेमुळे उष्णता निर्माण होऊन स्फोट होऊ शकतो

II एका वाक्यात उत्तरे

15. आम्ल आणि अल्कली या दोन्ही मध्ये क्रिया होऊन क्षार व पाण्याची निर्मिती होते त्या क्रियेला उदासीनीकरण क्रिया असे म्हणतात

16.जर प्लास्टर ऑफ पॅरिस उघडे ठेवले असता हवेतील ओलावा शोषून घेते व त्याचे रूपांतर जिप्सम मध्ये होते म्हणून प्लास्टर ऑफ पॅरिस आद्रता विरोधी भांड्यामध्ये साठविले पाहिजे

17. काही धातूची ऑक्साईडस आम्ल आणि अल्कली या दोन्ही बरोबर क्रिया करून क्षार आणि पाण्याची निर्मिती करतात तशा त्या ऑक्साइट्स ना उभयधर्मी ऑक्साइड्स म्हणतात.

18 नाही कारण स्वच्छके कठीण व मृदू पाण्यात फेस निर्माण करतात किंवा कॅल्शियम आणि मॅग्नेशियम क्षारा बरोबर अविद्राव्य गाळ((scum) तयार करत नाहीत

19. आम्लामध्ये H^+

अल्कली मध्ये OH^-

20. काच, साबण व कागद कारखान्यामध्ये ,बोरॅक्स सारख्या सोडियम संयुगाच्या निर्मितीमध्ये वापरतात

21. सामान्य क्षार तयार होते कारण सोडियम हायड्रॉक्साइड एक प्रबल अल्कली आहे .

22. आम्ल पाण्यात ओतून सतत हळूहळू ढवळत राहावे .

23. निळा लिटमस पेपर आम्लात बुडविल्यास त्याचा रंग लाल होतो आणि लाल लिटमस पेपर आम्लात बुडविल्यास तो लालच राहतो.

24. ज्या द्रावणाचा PH 0 ते असून चव आंबट असते त्यांना आम्ल म्हणतात 7.

25. $2NaOH + Zn \longrightarrow Na_2ZnO_2 + H_2$

26. कॅल्शियम कार्बोनेट $CaCO_3$

27. कार्बन डाय ऑक्साइड-

28 धातूची धातूची ऑक्साईडची पाण्याबरोबर क्रिया झाल्यास अल्कली तयार होते म्हणून त्यांना अल्कधर्मी ऑक्साईड्स म्हणतात.

29. अधातूच्या ऑक्साईडची पाण्याबरोबर क्रिया झाल्यास आम्ल निर्माण होते म्हणून त्यांना आम्लधर्मी ऑक्साईड्स म्हणतात.

30. आम्ल आणि अल्कली यांच्या संयोगाने तयार होणाऱ्या पदार्थाला क्षार म्हणतात.

31. हायड्रोजन किंवा हायड्रोनियम आयन H^+ /$H3O^+$

32. द्रावणाची आम्लीयता वाढते व PH चे मूल्य वाढते.

33. 5.5 पेक्षा कमी

34. सोडियम हायड्रोजन कार्बोनेट

35. $NaCl+H_2O+CO_2+NH_3 \longrightarrow NH_4Cl+NaHCO_3$

36 बेकिंग सोडा आणि टार्टारिक आम्ल यांच्या मिश्रणाला बेकिंग पावडर म्हणतात

37. सोडियम कार्बोनेट

38. खाण्याचा सोडा किंवा सोडियम हायड्रोजन कार्बोनेट

39. कारण बेकिंग सोडा पाण्यासोबत अभिक्रिया करून कार्बन डायऑक्साइड वायू तयार करतो.

दोन वाक्यातील उत्तरे

40. तीव्र आम्लामध्ये पाणी मिसळले तर त्या ठिकाणी उष्णता निर्माण होऊन मिश्रणावर त्याचा परिणाम होऊन मिश्रणाचे शिंतोडे बाहेर येऊ शकतात व त्यामुळे आपल्याला भाजू शकते व तसेच उष्णतेमुळे काचेचे भांडे फुटू शकते.

41. जेव्हा माती आम्लधर्मी झाली असेल तेव्हा ती लागवडीसाठी अयोग्य असते तेव्हा मातीचा अल्कलीपणा वाढवण्यासाठी कृषी तज्ञ शेतकऱ्याला विशिष्ट प्रमाणात चुना पावडर मिसळण्याचा सल्ला देतात.

42. A द्रावणाचा PH आहे त्याचे आम्लीय स्वरूप सर्वात जास्त आहे कारण त्यात 5H+ आयनांची तीव्रता जास्त आहे.

43. *चव आंबट असते.

*आम्लीय द्रावणात निळा लिटमस पेपर लाल होतो.

* हायड्रोजन आयन्स असतात.

* विजेचे चांगले वाहक आहेत .

44. *चव कडू आणि तुरट असते.

* अल्कली द्रावणात लाल लिटमस पेपर निळा होतो.

* हायड्रॉक्साइड आयन्स असतात.

*. विजेचे हे अवाहक आहेत .

45. लिटमस पेपरशी क्रिया झाली नाही तर शुद्ध पाणी उदासीन असते.

जर लाल लिटमस पेपर निळा झाला तर ते द्रावण अल्कली आहे .

आणि जर लाल लिटमस पेपर लालच राहिला तर ते द्रावण आम्ल आहे.

46. हायड्रोक्लोरिक आम्लाच्या व नायट्रिक आम्लाच्या जलीय द्रावणात आम्लीय गुणधर्म असतात पण ग्लुकोज व अल्कोहोल मध्ये अल्कोहोलच्या जलीय द्रावणामध्ये आयन्सची निर्मिती होत नाही त्यामुळे विद्युत बल्ब प्रकाशित होत नाही किंवा विद्युत प्रवाह वाहत नाही.


47. विद्युत प्रवाह आयनांच्याद्वारे वाहला जातोपावसाच्या पाण्यात विरघळलेले क्षार असतात ..व ते विद्युत प्रवाह वाहून नेतात परंतु शुद्ध पाण्यामध्ये किंवा उर्ध्वपातीत पाण्यामध्ये आयन तयार होत नाहीत. म्हणून विद्युत प्रवाह वाहत नाही.

दुधाचे दही झाल्यावर त्याचा 48PH कमी होतो कारण दुधाचे दही झाल्या वरती लॅक्टोजचे लॅक्टिक आम्लामध्ये रूपांतर होते व आम्लाचा PH कमी असतो म्हणून PH बदलतो.

49. दूध नासू नये म्हणून ताज्या दुधात बेकिंग सोडा घातल्यास दुधाचा PH थोडासा अल्कलाइन होतो. दूध थोडे जास्त अल्कधर्मी झाल्यास ते जास्त वेळ टिकून राहते.

IV. तीन वाक्यात उत्तरे

50.



51. कार्बन डाय ऑक्साइड-

$Ca(OH)_2 + Cl_2 \longrightarrow CaOCl_2 + H_2O$

पांढरा अवक्षेप

52.सोडियम हायड्रॉक्साइड

उपयोग

धातुवरील वंगण हटविणे

काच कागद व साबण कारखान्यांमध्ये वापरतात

53. अ.जी आम्ले जास्त प्रमाणात H^+ आयनांची निर्मिती करतात त्यांना प्रबल आम्लअसे म्हणतात.

ब. दातांचा PH जर 5. 5 पेक्षा कमी झाल्यास दातावरील इनमॅल चे आवरण निघून जाते व दात खराब व्हायला लागतात म्हणजेच दात किडतात. दाताचे किडणे रोखण्यासाठी अल्कलीय दंतमंजनाचा उपयोग करावा.

54..अ. ब्लिचिंग पावडर $CaOCl2$

*कापड उद्योगात कापूस आणि तागाची ब्लिचिंग करण्यासाठी

* कागद कारखाना मध्ये लाकडाचा लगदयाचे ब्लिचिंग करण्यासाठी *कपडे धुण्यासाठी, धुतलेले कपडे ब्लिचिंग करण्यासाठी

*अनेक रासायनिक उद्योगांमध्ये ऑक्सिडीकारक म्हणून

* पिण्याचे पाणी जंतूमुक्त करण्यासाठी (कोणतेही दोन)

ब. प्लास्टर ऑफ पॅरिस $CaSO_4.1/2H_2O$

*खेळणी बनविण्यासाठी

*सजावटीचे साहित्य बनवण्यासाठी

* पृष्ठभाग गुळगुळीत करण्यासाठी

* मोडलेल्या हाडाचे स्थान योग्य ठेवण्यासाठी(कोणतेही दोन)

55. ज्या क्रियेमध्ये आम्ल व अल्कली यांची क्रिया होऊन क्षार व पाण्याची निर्मिती होते त्या क्रियेला उदासीनीकरण क्रिया असे म्हणतात.

$$HCl + NaOH \longrightarrow NaCl + H_2O$$

56. कॅल्शियम सल्फेट हेमीहायड्रेट किंवा प्लास्टर ऑफ पॅरिस

57. जी आम्ले जास्त प्रमाणात H+आयनांची निर्मिती करतात त्यांना प्रबल आम्ल म्हणतात. व जी आमले कमी प्रमाणात H + आयनांची निर्मिती करतात त्या आम्लाला दुर्बल आम्ल म्हणतात .

पाण्यात आम्ल घालताना नेहमी पाण्यात हळूहळू आम्ल घालत ते सतत ढवळत रहावे .

58.अ.सोडियम हायड्रॉक्साइड NaOH

ब.ब्लिचिंग पावडर CaOCl2

क.प्लास्टर ऑफ पॅरिस $CaSO_4.1/2H_2O$

59.अ.आम्लयुक्त द्रावण--- e , h

अल्कलीयुक्त द्रावण f   g

ब.मॅग्नेशियम ऑक्साईड

60. ब्राईन द्रावणामध्ये बुडवलेल्या लिटमस पेपरचा रंगात बदल दिसून येत नाही कारण ते एक उदासीन द्रावण आहे . मिठाच्या जलीय द्रावणांमध्ये विद्युत प्रवाह सोडून मिळवलेल्या उत्पादनात बुडवलेला लाल लिटमस पेपर पेपरचा रंग निळा होतो कारण ते एक मूलभूत अल्कली आहे

61. प्रती आम्ल तयार करण्यासाठी P द्रावणाचा वापर करतात कारण ते सौम्य अल्कली आहे

उदासीन द्रावण तयार करण्यासाठी Q आणि S या द्रावणाचा वापर करतात Q हे तीव्र अल्कली व S हे प्रबल आम्ल आहे .

62. i.दही ---   लॅक्टिक आम्ल

ii .जाठररस -- हायड्रोक्लोरिक आम्ल

63.i.द्रावण A मध्ये H^+ आयन्सची तीव्रता जास्त आहे./ जर PH ची किंमत कमी असेल तर H^+ आयन्सची तीव्रता जास्त असते.

ii. द्रावण D मध्ये OH^- आयनांचे प्रमाण जास्त असते. कारण PH मूल्य पर्यंत वाढत 14 वरून 7 असताना OH- आयनांचे प्रमाण वाढते.

उदासीन द्रावण तयार करण्यासाठी. A आणि D, B आणि C

64.i.आम्ल आणि अल्कली यांच्यामध्ये क्रिया होऊन क्षार व पाण्याची निर्मिती होते याला उदासीनीकरण क्रिया असे म्हणतात

क्लोर अल्कली प्रक्रियेची उत्पादने--- हायड्रोजन क्लोरीन आणि सोडियम हायड्रॉक्साइड ,

हायड्रोजनचे उपयोग ---

*इंधन म्हणून वापरले जाते

*कृत्रिम लोणी तयार करण्यासाठी

*खतांसाठी अमोनिया

क्लोरीन चे उपयोग ----

*जलशुद्धीकरणात

* जलतरण तलाव मध्ये

*PVC पाईप्स मध्ये

*CFC मध्ये

*जंतुनाशक म्हणून

सोडियम हायड्रॉक्साइड चे उपयोग ----

*धातूवरील वंगण हटवण्यासाठी

*काच कागद साबण कारखान्यांमध्ये

*स्वच्छके बनवण्यासाठी

*कृत्रिम तंतू बनवण्यासाठी

65. कोरड्या चुन्या बरोबर क्लोरीनची क्रिया होऊन ब्लिचिंग पावडर तयार होते

$$Ca(OH)_2 + Cl_2 \longrightarrow CaOCl_2 + H_2O$$

*कापड उद्योगात कापूस आणि तागाचे ब्लिचिंग करण्यासाठी कागद कारखान्याच्या मध्ये लाकडाच्या लगद्याचे ब्लिचिंग करण्यासाठी.

* रासायनिक प्रक्रियेमध्ये ऑक्सिडीकारक म्हणून कपडे धुण्यासाठी व धुतलेले कपडे ब्लिचिंग करण्यासाठी

*पिण्याचे पाणी जंतूमुक्त करण्यासाठी (कोणतेही दोन)

मिठाचे द्रावण हे उदासीन द्रावण आहे

$$HCl + NaOH \rightarrow NaCl + H_2O$$

66.अ. निळा लिटमस पेपरचा रंग अल्कली द्रावणात बदलत नाही .

ब.जेव्हा मातीचा आम्लीय गुणधर्म वाढतो तेव्हा मातीचे PH मूल्य कमी होते किंवा तेव्हा H+ किंवा H3O+आयन्स वाढतात .

आम्ल	अल्कली
चव आंबट असते	चव कडू व तुरट असते
आम्लीय द्रावणात निळा लिटमस पेपर लाल होतो.	अल्कली द्रावणात लाल लिटमस पेपर निळा होतो.
हायड्रोजन आयन असतात	हायड्रॉक्साइड आयन्स असतात
PH 0 ते 7	PH 7 ते 14
आम्ल हे विजेचे चांगले वाहक असतात	हे अवाहक आहेत.

5. जीवन क्रिया

1.A. पित्तामुळे आम्लयुक्त अन्न अल्कधर्मी बनते.

2.C. लहान आतडे

3.D क्लोम प्रवाहिनी

4 Dप्रति वाहिनी .

5.D. स्थानांतरण

6. A.जलवहन

7.C. उत्सर्जन

8. B.कलकणू

9.B.मूत्राच्या स्वरूपात युरियाचे उत्सर्जन

10.A.वायूंची देवाण घेवाण-

11.B.नेफ्रॉन

12.C.लिम्फ

13.B.प्रवाहिनी

14.Aउर्द्धगामी जोर निर्माण करणे

15.C.मूत्राशय

16.B.प्रकाष्ठ ऊतीमध्ये पाण्याचा स्तंभ स्थापित करणे

17.A.बाष्पोत्सर्जन

18.C.वनस्पतीच्या उंच भागामध्ये पाणी नेण्यासाठी

एका वाक्यातील उत्तरे

19. स्नायू पेशी मध्ये ऑक्सिजनची कमतरता असताना लॅक्टिक आम्ल तयार होते.

20. हृदयाची डावी व उजवी बाजू विभक्त असल्यामुळे पक्षी व सस्तनी प्राण्यांच्या मध्ये उच्च प्रतीचा ऑक्सिजन पुरवठा होतो .

21. इथेनॉल कार्बन डायऑक्साइड व ऊर्जा-.

22. कारण अन्नामधील सेल्युलोज चे पचन होण्यासाठी हरिण व सशाच्या आतड्याची लांबी जास्त असते.

23. पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण हवेतील ऑक्सिजन पेक्षा कमी असते त्यामुळे जलचर अधिक ऑक्सिजन मिळवण्यासाठी जलद श्वास घेतात.

24. रक्त गोठविणे .

25. स्थानांतरण .

26. वनस्पतीच्या हवेमध्ये असणाऱ्या भागातून वाफेच्या रूपाने पाणी बाहेर पडण्याच्या क्रियेला बाष्पोत्सर्जन म्हणतात .

27. पृष्ठवंशी प्राण्यात रक्ताच्या वहनाच्या प्रत्येक चक्रामध्ये रक्त हृदयामधून दोनदा जाते त्यालाच दुहेरी रक्ताभिसरण म्हणतात.

28 च यापचय क्रियेमध्ये निर्माण झालेले घातक टाकाऊ व पदार्थ बाहेर टाकण्याच्या क्रियेला उत्सर्जन म्हणतात .

29. पर्णरंध्रे उघडणे व बंद करणे .

30. प्रकाश संश्लेषणासाठी कार्बन डाय ऑक्साइड ची आवश्यकता नसताना पर्णरंध्रे बंद होते-.

31. रक्त व पेशी यांच्यातील कार्बन डाय-ऑक्साइड व ऑक्सिजन वायूची देवाण घेवाण-.

32. परिकाष्ठातील तर्षण दाब वाढून पाणी शिरते व हा दाब परिकाष्ठातील पदार्थाला कमी दाब असणाऱ्या उतीमध्ये ढकलतो व पदार्थाचे वहन होते .

33. श्वसन चक्र दरम्यान फुफ्फुसे श्वास घेताना आणि बाहेर टाकताना नेहमीच थोड्या प्रमाणात हवा टिकून ठेवतात. त्यामुळे ऑक्सिजन शोषण व कार्बन डाय ऑक्साइड बाहेर टाकण्यासाठी- पुरेसा वेळ मिळतो.

34. शोषणद्रिंये .

35. शोषण करणारा पृष्ठभाग वाढतो शोषण इंद्रियातील केशवाहिन्या शोषून घेतलेला अन्न रस शरीराच्या प्रत्येक पेशीला पुरवितात.

36. सेल्युलोज चे पचन होण्यासाठी लहान आतड्याची लांबी जास्त लागते.जी मानवामध्ये शाकाहारी पेक्षा कमी आहे. म्हणून मानव गवत पचवू शकत नाही.

37. बहुपेशीय सजीवांमध्ये सर्व पेशी आसपासच्या वातावरणाशी संपर्क साधू शकत नाहीत .

38. कारण विकरे संयुक्त अन्नाचे साधा अन्नपदार्थात रूपांतर रूपांतर करण्यास मदत करतात म्हणून ती जैविक उत्प्रेरके आहेत .

39 श रीराची निगा राखणाऱ्या व व्यवस्थापनाचे कार्य एकत्रितपणे करणाऱ्या क्रियांना जीवनप्रक्रिया म्हणतात.

40. ऑक्सिश्वसन व विनॉक्सिश्वसन

41.पायरुवेट

42. अन्न सेवन करून त्याचे पचन करून ते वापरण्याच्या प्रक्रियेला पोषण म्हणतात.

43प्रकाष्ठ आणि परिकाष्ठ

44. हरितद्रव्य सूर्यप्रकाश कार्बन ऑक्साइड यांच्या सहाय्याने वनस्पती स्वतःच त्यांना-डाय-स्वतः तयार करतात त्या क्रियेला प्रकाश संश्लेषण क्रिया म्हणत ात

45. पेशी मध्ये ग्लुकोज ऑक्सिजनची अभिक्रिया करून ऊर्जा मुक्त करण्याच्या क्रियेला पेशीय श्वसन म्हणतात

46. जे सजीव अन्नासाठी दुसऱ्यावर अवलंबून असतात त्यांना परजीवी किंवा परपोषी म्हणतात

47A व्यक्तीमध्ये B पेक्षा जास्त

48. X—प्रवाहिनी

Y--- प्रति वाहिनी


* प्रति वाहिनी मध्ये झडपा असतात

*वनस्पतीमध्ये अतिरिक्त पाणी बाहेर टाकणे.

49 पाण्याला वरच्या दिशेने हालचाल करण्यास मदत करणे.

दोन वाक्यात उत्तरे

पर्णरंध्राची आकृती 50



51. शाकाहारी प्राण्यांच्या आतड्याची लांबी सेल्युलोजचे पचन करण्यासाठी मांसाहारी प्राण्यांपेक्षा जास्त असते.

52. लाळेमध्ये सलायवरी अमायलेज असते हे चपातीत मिसळल्यावर संयुक्त रूपातील स्टार्च चे विघटन करून त्याचे साध्या शर्करेत रूपांतर करते म्हणून चपाती हळूहळू चावल्यास गोड लागते .

53.जवनीकेतून रक्त शरीरात जाताना दाब जास्त असतो म्हणून त्याच्या भीती जाड असतात.


*शरीराचे तापमान योग्य राखण्यासाठी ही ऊर्जा वापरली जाते

सलायवरी अमायलेज संयुक्त स्टार्चचे साध्या शर्करेत विघटन करते 54.

55.अ आकृती   1 उघडे पर्णरंध्र असल्यामुळे वायूच्या देवाणघेवाणीचा दर उच्च असतो.

X--- रक्षक पेशी.   Y---- हरितलवके

56.



57. विकरांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी स्निग्ध पदार्थांचा आकार लहान करणे हे पित्तरसाचे कार्य आहे अन्नाचे माध्यम अल्कली असण्यासाठी पित्तरस मदत करतो चरबीच्या मोठ्या कणांचे लहान कण करतो अल्कधर्मी बनवतो.त्यामूळे विकारांची क्षमता किंवा पोषकता वाढते.

58. तांबड्या पेशी मध्ये असलेल्या हिमोग्लोबिन मध्ये ऑक्सिजनचे आकर्षण असते जे फुफ्फुसा मधून शरीराच्या इतर भागांकडे वाहून नेले जाते ऑक्सिजन पेक्षा जास्त ऑक्सिजन हा पाण्यात विद्राव्य त्यामुळे रक्त प्लाझ्माद्वारे पोहोचले जाते

59 सरडा व बेडूक यांचे हृदय तीन कप्प्यांचे असते त्यामुळे ऑक्सिजन युक्त व ऑक्सिजन विरहित रक्त असले एकमेकांत मिसळले जाते त्याचा त्यांच्या जीवनावर परिणाम होत नाही म्हणून त्यांचे तापमान पर्यावरणातील तापमान यावर अवलंबून असते

ऑक्साइड दोन्ही रक्ताद्वारे वाहून-ऑक्सिजन व कार्बन डाय 60 नेले जातात म्हणून हृदयात ऑक्सिजन युक्त रक्त कार्बन डाय ऑक्साइड युक्त रक्त मिसळलेले दोन असू शकते दोन्ही- एकमेकात मिसळून आहेत म्हणून हृदयामध्ये वेगवेगळे कप्पे आहेत

61. दुहेरी रक्ताभिसरणनामुळे शरीराच्या सर्व भागांना ऑक्सिजन युक्त रक्त जलद पोहोचण्यास मदत होते त्यामुळे शरीराला ऑक्सिजनचा उच्च प्रतीचा पुरवठा होतो तसेच याचा उपयोग शरीराचे तापमान राखण्यासाठी लागणारी ऊर्जा मिळवण्यासाठी सुद्धा होतो

62. तीन कप्प्याचे हृदय असल्यामुळे शुद्ध व अशुद्ध रक्त मिसळल्यामुळे रक्ताभिसरण अपूर्ण होते व दुहेरी रक्ता विसरण घडले नसते म्हणून उच्च प्रतीचा ऑक्सिजन पुरवठा झाला नसता

63. गवत खाणाऱ्या शाकाहारी प्राण्यांना सेल्युलोजचे पचन करण्यासाठी लांब लहान आतडे असते पण वाघासारखे मांसाहारी प्राणी मांस सहज पचवू शकतात. म्हणून माणसाने प्राण्यांच्या तळ्याची लांबी कमी असते.

64.वाळवंटात असणाऱ्या वनस्पतींना पाण्याच्या कमतरतेला सामोरे जावे लागते जेव्हा सकाळी पर्ण रंध्र बंद होतात रात्रीच्या वेळी ते कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि अन्नपदार्थ तयार करतात तो नंतर हरितद्रव्याद्वारे दिवसा शोषून घेतला जातो व ऊर्जा पुरविली जाते.

65. हिरव्या वनस्पती हरितद्रव्य, सूर्यप्रकाश, कार्बन डायऑक्साइड यांच्या सहाय्याने स्वतःचे स्वतः तयार करताना व कर्बोदकांची निर्मिती होते यालाच प्रकाश संश्लेषण क्रिया म्हणतात.

* उत्पादित झालेले पदार्थ कर्बोदके ,(ग्लुकोज)ऑक्सिजन .

* वनस्पती मधील ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी कर्बोदकांचा वापर केला जातो.

66.. आतड्यामधील पचन झालेले आणि शोषण घेतलेले स्निग्ध पदार्थ वाहून नेण्याचे कार्य करतात तसेच पेशी बाहेरील जागेमधून जास्तीचे द्रव पदार्थ काढून टाकून ते परत रक्तामध्ये मिसळण्याचे कार्य करते, म्हणून लिंम्फ हा आपल्या रोगप्रतिकारक शक्तीचा महत्त्वाचा घटक आहे.


67.

क्रम संख्या	प्रवाहिनी	प्रति वाहिनी
1.	ह्दयाकडून शरीरातील इतर भागाकडे रक्त येणाऱ्या वाहिनीला प्रवाहाने म्हणतात	शरीराच्या सर्व भागांकडून ह्दयाकडे रक्त परत आणणाऱ्या वाहिन्यांना प्रति वाहिनी म्हणतात
2.	रक्तावर उच्च दाब असतो	रक्तावर दाब नसतो
3.	प्रवाहिन्यांच्या भीत्ती जाड असतात	भीत्ती जाड नसतात
4.	झडपा नसतात	झडपा असतात रक्त एकाच दिशेने प्रवाहित व्हावे म्हणून

68. हायड्रोक्लोरिक आम्लामुळे आम्लीय माध्यम जठरात तयार होते. त्यामुळे पेप्सीन विकरांची क्रिया सुलभपणे होते. श्लेष्मलामुळे जठराच्या आतील भित्तीचे सर्वसाधारण स्थिती पासून आम्लाचे संरक्षण होते. अन्नामधून पोटात प्रवेश करणाऱ्या सूक्ष्मजंतूंचा नाश करते.

IV. तीन वाक्यातील उत्तरे

69.



70. लहान आतड्यामध्ये कार्बोहायड्रेट (पिष्टमय पदार्थ) प्रोटीन, स्निग्ध पदार्थांचे पूर्णपणे पचन होते. जठरातून येणारे अन्न आम्लयुक्त असते. स्वादुपिंडातील पाचक रसांची क्रिया होण्यासाठी अल्कली माध्यमाची गरज असते. हे काम यकृतातील पित्त रस करतो. मोठ्या स्निग्ध पदार्थांवर विकरांची प्रक्रिया होणे कठीण जाते. म्हणून पित्तरस त्यांचा आकार लहान करतो. ट्रिप्सीन प्रोटिन्सचे पचन ,लायपेज स्निग्ध पदार्थांचे पचन ,आंत्ररस प्रोटीनचे अमिनो आम्लामध्ये रूपांतर

संयुक्त कार्बोहायड्रेटचे ग्लुकोज व स्निग्ध पदार्थाचे स्निग्धाम्ले ग्लिसरॉल मध्ये रूपांतर करतात .शोषणक्रिंये अन्न रस शोषून घेतात.

